**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचे पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीचे इतिवृत्त..**

---

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचा अर्ज जसे गोदावरी नदी पात्रातील रेती घाट जसे पाटेगाव, विरभद्रा नदी पात्रातील रेती घाट जसे नांदर भाग २, नांदर भाग ३ आणि ब्रह्मगाव जनसुणावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १६/१०/२०२५ रोजी सकाळी १०:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. १५/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं.ई-७१ ऑफ २०२५ दि. १५/१०/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. श्रीमती नीलम बाफना : अध्यक्ष
उपविभागीय अधिकारी
उपविभागीय कार्यालय पैठण

२. श्री. मनिष होळकर : सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर.

३. श्री.अच्युत नांदवटे : समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
छत्रपती संभाजी नगर

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, जिल्हा



होळकर

खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांचा अर्ज जसे गोदावरी नदी पात्रातील रेती घाट जसे पाटेगाव, विरभद्रा नदी पात्रातील रेती घाट जसे नांदर भाग २, नांदर भाग ३ आणि ब्रह्मगाव जनसुणावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १६/१०/२०२५ रोजी सकाळी १०:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. १५/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार जाहीर सूचना ३० दिवस अगोदर दि. १६/०९/२०२५ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. सदर प्रकल्पाची माहिती पुस्तिका, कार्यकारी सारांशाची प्रत, पर्यावरण आघात मुल्यांकंन अहवालाच्या प्रती इत्यादी दस्तावेज (इंग्रजी व मराठी मध्ये) जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या व याबाबत काही सूचना / आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात आलेली होती. , त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

२. जिल्हा परिषद कार्यालय, अंबा अप्सरा समोर, छत्रपती संभाजीनगर.

३. जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर.

४. तहसिल कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.

५. पंचायत समिती कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.

६. ग्रामपंचायत कार्यालय, पाटेगाव/नांदर भाग २/ नांदर भाग ३ आणि ब्रह्मगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.

७. प्रादेशिक कार्यालय/उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. ४/१ पर्यावरण भवन लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा, औद्योगिक क्षेत्र, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.

८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

९. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

जन सुनावणी बाबत वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेमध्ये प्रकल्पासंबंधीत बाधित अथवा इतर व्यक्तींनी प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांशाच्या प्रति अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाबाबत आपले मत, विचार, सूचना , हरकती लेखी स्वरूपात सुनावणीच्या दिवसापर्यंत उप छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात याव्यात अथवा सुनावणीच्या दिवशी देण्यात याव्यात . सुनावणी दरम्यान आपले लेखी मत, विचार, सूचना , हरकती सादर केल्या जाऊ शकतात अथवा त्यांचे सादरीकरण केले जाऊ शकते याबाबत आवाहन करण्यात आले. त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे लोकांकडून पैठण तालुक्यातील ४ ठिकाणांचे प्रस्तावित रेतीघाटांबाबत सुनावणीच्या दिवसापर्यंत कुठल्याही आक्षेप हरकती अथवा सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.

त्यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जन सुनावणी ही सर्वसामान्य लोकांसाठी त्यांचे मत व्यक्त करण्याचे ठिकाण असून पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती संमत करण्याबाबत निर्णय पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय येथे घेतला जाईल. त्यामुळे त्यांनी उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्प बाबतचे त्यांचे मत आक्षेप हरकती सूचना व्यक्त करण्याबाबतचे आवाहन केले. आपण व्यक्त केलेले मत सूचना आक्षेप यांचे व्हिडिओ शूटिंग करून त्याबाबतचे इतिवृत्त पर्यावरण विभाग मंत्रालय यांना सादर केले जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणी समितीच्या अध्यक्षा तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती बाफना यांनी पर्यावरण विषयक जन सुनावणी सुरू करण्याचे व प्रकलप प्रवर्तकास त्यांच्या प्रकल्पाचे पर्यावरण विषयक ठळक बाबी पर्यावरण विषयक केलेल्या उपायोजना इत्यादी बाबत सादरीकरण करतील असे सांगितले. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार इन्वायरो टेक्नो कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यांच्या साजरीकरणात त्यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती उत्खनन करावयाचे खनिज रेतीघाट प्रस्तावित करणारी समिती व उत्खनन करण्यासाठी ठरवून दिलेला कालावधी इत्यादी बाबतची माहिती दिली. रेती उत्खननाची पद्धत वायु प्रदूषण नियंत्रण यंत्रणा ध्वनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा वाहतूक व्यवस्थापन वृक्षारोपण योजना इत्यादी बाबतची इत्यंभूत माहिती देण्यात आली. सुनावणी दरम्यान त्यांनी प्रस्तावित रेती घाटाचे कार्यक्षेत्र, अंदाजीत उत्खनन होणारी रेती, उत्खननासाठी वापरली जाणारी यंत्रणा व पर्यावरण पूरक उपाय योजनांची माहिती दिली. रेती उत्खननाबाबत जिल्हा खनीकर्म अधिकारी जिल्हा पर्यावरण विषयक समितीस नियमितपणे अहवाल सादर करतील. जिल्हा खनिकर्म समिती माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली असून सदर समितीत उपविभागीय अधिकारी तहसीलदार कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग पोलीस आणि आरटीओ विभागाचा प्रतिनिधी यांचा समावेश असून जिल्हा खनिकर्म अधिकारी सदर समितीचे सदस्य सचिव आहेत. गौण खनिज उत्खनन प्रकल्पाबाबत पर्यावरण विभाग मंत्रालय यांचे परिपत्रक दिनांक ३ डिसेंबर २०१९ व परिपत्रक दिनांक ०४ मे २०२० अनुसार पर्यावरण विषयक सुनावणी घेण्यात येत आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांचे सादरीकरण संपले असे जाहीर करून उपस्थित जनसमुदायास त्यांचे प्रश्न, शंका अथवा सूचना देऊ शकतात असे सांगितले.

लोळकर

अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी उपस्थित जनसमुदायास पैठण तालुक्यातील रेती उत्खनन प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना , विचार, हरकती नोंदविण्यासाठी सर्वप्रथम आपले नाव सांगावे आणि त्यानंतर आपले प्रश्न मांडावेत असे सांगितले.

१. सरपंच ब्रह्मगाव – रेती उत्खननानंतर वाहतुकीमुळे गावच्या रस्त्यांची दुरावस्था होत असून त्याकडे प्रशासन लक्ष देत नाही याबाबत प्रश्न उपस्थित केला.
   सल्लागार प्रकल्प प्रवर्तक यांनी  पैठण तालुक्यातील चार प्रस्तावित रेती घाटांना जोडणारा रस्ता गावाच्या बाहेरून दिलेला असून रेती उत्खननानंतर वाहतुकीचा गावांच्या रस्त्यावर परिणाम होणार नाही असे सांगितले. जिल्हा खणीकर्म अधिकारी यांनी सदर बाबत भविष्यात काही अडचणी उद्‌भवल्यास आपण तहसीलदार पैठण यांच्याकडे तक्रार दाखल करू शकता असे सांगितले.
२. **ब्रह्म गावचे नागरिक श्री कल्याण कृष्णा लोहगळे** यांनी सांगितले की  मी ग्रामपंचायत सदस्य असून ब्रह्म गावला आपण एक मीटरची रेती उत्खननाची परवानगी दिली परंतु कंत्राटदार दोन मीटर रेती उत्खनन करतो. त्यामुळे नदी पात्रात सद्यस्थितीत तीन मीटर पाण्याची खोली असून मला माझ्या शेतामध्ये जाण्यासाठी रस्त्याची अडचण निर्माण होत आहे. आमच्या गावच्या वॉटर सप्लाय स्कीम मधून ब्रह्मगाव मांडवा टाकळी उंचेगाव इत्यादी गावांना पाण्याचा पुरवठा केला जात असून वाळू उत्खननामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होऊन भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे त्या गावातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या समजून घेण्याची जबाबदारी शासनाची आहे असे त्यांनी मत व्यक्त केले. मागच्या वर्षी ब्रह्मगाव परिसरातून आपण दोन मीटर रेती उपसा केल्यामुळे आज त्या ठिकाणी शेती शिल्लक राहिलेली नाही. सद्यस्थितीत पैठण तालुक्यातील अतिवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत आलेला असून सर्व जमीन वाहून गेलेली आहे. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांची भूमिका समजून वाळू उत्खननाबाबत निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो. पर्यावरणाचा विचार करता शासनाने अद्याप वृक्ष लागवड केल्याचे दिसून येत नाही. ब्रह्मगाव व परिसरातील रस्त्यांची दुरावस्था वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे होत आहे. ब्रह्मगावचा रेती साठा उत्खनन करून त्याचा पुरवठा बाहेरगावी केला जात आहे व त्यामुळे स्थानिक घरकुलांसाठी रेती दिली जात नाही याबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली.
   त्यादरम्यान जिल्हा खनि कर्म अधिकारी यांनी “ घरकुलांसाठी ऑनलाईन अर्ज केल्यास रेती उपलब्ध करून दिली जाऊ शकते असे सांगितले.”
   त्यावेळी श्री कल्याण कृष्णा लोहगळे यांनी सांगितले की “सर्व शेतकरी व घरकुलधारक अशिक्षित असून त्यांना ऑनलाईन अर्ज करण्याबाबत माहिती नाही.”
   अध्यक्ष जिल्हा पर्यावरण समिती श्रीमती बाफना यांनी सांगितले की “ आजच्या जन सुनावणी दरम्यान ब्रह्मगाव परिसरातील बाळू उत्खननासाठी राखीव सर्वे नंबर बाबतची माहिती दिलेली आहे. नवीन वाळू उत्खनन धोरणानुसार उपलब्ध साठ्यापैकी दहा टक्के साठा स्थानिक घरकुलांच्या बांधणीसाठी राखीव ठेवलेला असून त्याबाबत आपण शासनाकडे अर्ज केल्यास आपणास वाळू उपलब्ध करून दिली जाईल.”
   त्यावेळी श्री कल्याण कृष्णा लोहगळे यांनी सांगितले की “ आपण सादरीकरणात दाखवलेल्या सर्वे नंबरच्या ठिकाणी सद्यस्थितीत वाळू उपलब्ध नाही.”

त्यावेळी अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी सांगितले की “ सदर बाबत तांत्रिक समितीने अहवाल दिलेला असून त्यांनी याबाबतचा पूर्ण अभ्यास केलेला आहे. शासनाच्या नवीन वाळू धोरणानुसार उपलब्ध रेती साठ्यापैकी दहा टक्के साठा घरकुलाच्या बांधणीसाठी राखीव ठेवलेला असून त्याबाबतची अंमलबजावणी शासन स्तरावरून आमच्याकडून केली जाते. ब्रह्मगाव येथे उपलब्ध

वाळू साठ्याबाबत शासनाच्या तांत्रिक समितीने अहवाल दिलेला असून त्या अनुषंगाने शासनाने वाळू साठे उत्खनन प्रस्तावित केले आहे."

श्री कल्याण लोहगळे यांनी " शासनाच्या तांत्रिक समितीमध्ये स्थानिकांना सामावून घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. वाळू उत्खननाबाबत शासन नियुक्त तांत्रिक समितीने गावचे सरपंच व ग्रामस्थांना विश्वासात घेतलेले नाही. त्यामुळे तुम्ही ब्रह्मगाव हद्दीतील रेती उत्खनन करू नये अशी त्यांनी विनंती केली."

सदर बाबत अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी " आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करा जेणेकरून आपला अर्ज शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे शक्य होईल असे सांगितले.

जन सुनावणी समन्वयक श्री नांदवटे यांनी सांगितले की " आपण प्रस्तावित रेती घाटाबाबतचे आपले आक्षेप सूचना आणि विचार लेखी स्वरूपात आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात सादर केल्यानंतर त्याचा इतिवृत्तात उल्लेख करून ते शासनास सादर करण्यात येईल.

३. सुनावणी समन्वयक श्री नांदवटे यांनी प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांना " पैठण तालुक्यातील प्रस्तावित रेती घाटाची पर्यावरण विषयक तपासणी करून त्याच्या गुणवत्तेचा तपशील ( एनवायरमेंटल बेसलाईन) तयार केला आहे का" असे विचारले. त्याबाबत प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की " त्याबाबतचा अभ्यास आम्ही केलेला नसून एनवायरमेंट मॅनेजमेंट प्लॅनमध्ये त्याची आवश्यकता नाही असे वाटते.

श्री नांदवटे यांनी विचारले की " रेती उत्खननादरम्यान प्रदूषणाची पातळी तपासणी करणे व त्याबाबतचे अहवाल ( पोस्टमॉनिटरिंग रिपोर्ट) शासनास सादर करणे बंधनकारक आहे."

प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सांगितले की " सदरबाबत ठेकेदारास आदेशित करण्यात येईल.

४. अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी " दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर हा कालावधी पावसाचा असल्याकारणाने त्यादरम्यान रेती उत्खनन करणे शक्य होणार नाही." त्याबाबत प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की " उपरोक्त कालावधी वगळून रेती उत्खननाची निविदा प्रक्रिया पार पाडली जाईल."

५. अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी " प्रस्तावित रेती प्रकल्प बाबत आपले काही मत असल्यास उपस्थितांनी व्यक्त करावे असे आवाहन केले."

६. ग्राम महसूल अधिकारी नांद्रा श्री केंद्रे यांनी सांगितले की नांद्रा येथील प्रस्तावित प्रकल्पाच्या जवळ दोन केटी विहीर असून त्या ठिकाणी रेती उत्खनन चालेल का असा प्रश्न उपस्थित केला. .

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केटी विहीर पासून १०० मीटर क्षेत्र रेती उत्खननास प्रतिबंधित केलेले असून रस्त्याच्या पुलापासून ६०० मीटर दूर अंतरावर रेती उत्खनन प्रस्तावित केलेले आहे.

७. सदस्य जन सुनावणी समिती श्री होळकर यांनी " नदीपात्रापासून किती मीटर अंतरावर रेती उत्खनन केले जाईल व नदीपात्राची रुंदी किती आहे " याबाबत प्रश्न उपस्थित केला. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की " नदीतीरापासून सात मीटर अंतर उत्खननासाठी प्रतिबंधित आहे. नदीपात्राची रुंदी प्रत्येक रेती उत्खनन स्थळे वेगवेगळी असून नदीतिरापासून सात मीटर उत्खनन केले जाणार नाही असे त्यांनी सांगितले. आपण प्रश्न उपस्थित केलेल्या प्रकल्प स्थळी नदीपात्राची रुंदी चाळीस मीटर आहे. एकूण नदीपात्राच्या २/३ भागात रेती उत्पन्न केले जाईल व त्याचदरम्यान नदीतिरापासून सात मीटर अंतर प्रतिबंधित क्षेत्र असेल असे त्यांनी सांगितले.

होळकर

" उत्खननानंतर किती रेती साठा खाली ठेवला जातो " असा प्रश्न श्री होळकर यांनी उपस्थित केला. त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की " दोन मीटर रेती साठा नदी मृत अवस्थेत न जाण्यासाठी म्हणून संरक्षित केलेला आहे..

८. श्री कृष्णा लोहगळे यांनी सांगितले की " सद्यस्थितीत जास्त रेती साठा नसल्याकारणाने एक मीटर रेती साठा ठेवून उर्वरित रेती साठा आमची काही हरकत नाही.

त्यावर प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की " वाळूसाठा शिल्लक नसल्यास ठेकेदार त्याचा लिलाव होणार नाही अथवा ठेकेदार लिलावात भाग घेणार नाहीत त्यामुळे प्रस्तावित रेती उत्खनन होणार नाही.

श्री कृष्णा लोहगळे यांनी सांगितले की " Survey No. १०४ ब्रह्मगावच्या शेजारी आमची वॉटर सप्लायची विहीर आहे. आपण दरवर्षी एकाच ठिकाणी रेती उत्खनन करून आमच्या गावावर अन्याय करत आहात.

त्यावेळी पर्यावरण यांनी सांगितले की " रेती उत्खनन झाल्यानंतर निर्माण झालेल्या नदीपात्रातील खड्ड्यामध्ये नवीन रेती येऊन जमा होते व त्याच रेतीचे उत्खनन आपण करू शकतो. त्यामुळे एकाच ठिकाणाहून रेती उत्खनन करण्यात येते असे म्हणणे चुकीचे आहे.. रेती उत्खनन केल्यानंतर निर्माण झालेल्या खड्ड्यामध्ये नदीच्या पाण्यासोबत वाहत येणारी रेती साठवून राहते व तिचे आपण उत्खनन करतो" असे सांगितले.

श्री कृष्णा लोहगळे यांनी " ब्रह्म गावचे रेती उत्खनन करण्यात येऊ नये " अशी विनंती केली.. त्याबाबत अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी " त्यांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याबाबत सांगितले जेणेकरून त्यांचे लेखी म्हणणे पर्यावरण विभाग मंत्रालय महाराष्ट्र शासन यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे शक्य होईल. ब्रह्मगावचे तलाठी तांत्रिक अधिकारी नसून शासनाकडून नियुक्त झालेली तांत्रिक समिती रेतीसाठा उत्खननासाठी स्थळ निश्चिती करण्यास सक्षम आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित करता येणार नाही" असे अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी सांगितले. समन्वयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की " जन सुनावणीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली जात असून आपण व्यक्त केलेले मत व त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग सुनावणीच्या इतिवृत्त सोबत पाठविण्यात येईल."

उपस्थित श्री कृष्णा लोहगळे यांनी जन सुनावणी समितीतील तांत्रिक सदस्यांच्या नियुक्ती बाबत प्रश्न उपस्थित केला असता अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी सांगितले की " सदर बाब शासनाच्या अधिकार कक्षेत असून शासनाकडून जारी केलेल्या शासन निर्णयानुसार समिती सदस्य नियुक्त केले जातात. सर्वसामान्य जनतेचे मत विचार व आक्षेप ऐकून घेण्यासाठी जन सुनावणीचे आयोजन केलेले आहे."

९. सदस्य जन सुनावणी समिती श्री होळकर यांनी " रेती उत्खनन नंतर दोन मीटरचा शिल्लक ठेवलेला रेतीसाठा आपण अवैध वाळू उत्खननासाठी उपलब्ध करून देत नाही का? अशी शंका उपस्थित केली. त्यामुळे ०.५ मीटर रेती उत्खननाऐवजी सर्व रेती साठा जसे २.५ मीटर उत्कलन केल्यास काय नुकसान होईल असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की " सर्व रेतीसाठा उत्खनन केल्यास नदी मृत अवस्थेत जाऊन पर्यावरणाचे नुकसान होऊ शकते . उत्खननानंतर २.० मीटर संरक्षित रेतीसाठा भूगर्भातील पाणीसाठा व सभोवतालची पर्यावरण साखळी जिवंत ठेवण्यासाठी ठेवला जातो".

त्यानंतर माननीय अध्यक्ष जनसुनावणी समिती यांनी उपस्थित यांचे प्रश्न संपले असतील असे गृहीत धरून जनसुनावणी संपन्न झाली असे मी जाहीर करते असे सांगितले. जन सुनावणी समन्वयक यांनी त्यांचे आभार मानून झालेल्या जन सुनावणीचे इतिवृत्त व व्हिडिओ रेकॉर्डिंग पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय

यांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगून जन सुनावणी संपली असे जाहीरकेले.

(अच्युत नांदवटे)
**समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

(श्री. मनिष होळकर )
**सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

(श्रीमती नीलम बाफना)
**अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी**
**उपविभागीय कार्यालय पैठण**

*****************************************